
ज्ञान-विज्ञान विमुक्तये

# UGC Sponsored

## Two Day National Seminar

On

# SUBALTERN MOVEMENTS IN MODERN MAHARASHTRA



Organized By


**Research Center & P G Department of History**
**New Arts, Commerce & Science College,**
**Ahmednagar**
( NAAC Re - Accredited 'A' Grade with CGPA 3.53)


seminar

# PROCEEDINGS

22nd & 23rd September 2015


Chief Editor :
**Dr. K. M. Ambade**
Head, Research Center & P G Department of History

Associate Editor :
**Prof. M. A. Kashid, Dr. Me[illegible]a Sale**



ISBN:- 978-93-83401-27-7

| अ.नं. | पेपरचे नांव | प्राध्यापकांचे नांव | पान. नं. |
|---|---|---|---|
| १९. | महाराष्ट्रातील आदिवासी चळवळ | प्रा. शिताळे रमेश अंबऋषी | ७२ ते ७३ |
| २०. | " बाबासाहेब आंबेडकरोत्तर परिवर्तनवादी दलित चळवळ" | कौतिक दांडगे<br>डॉ. राजेंद्र धाये | ७४ ते ७६ |
| २१. | नाशिक सत्याग्रहातील दलित चळवळीचे मुल्यमापन | प्रा.सानप मालती अशोक | ७७ ते ८० |
| २२. | Dr.Babasaheb Ambedkar And Farmers Movement | Dr.Amol S Vidyasagar | ८१ ते ८३ |
| २३. | दलित चळवळ | कु. मेहेत्रे मनीषा प्रभाकर. | ८४ ते ८८ |
| २४. | सबाल्टर्न इतिहास लेखनाच्या संदभार्त स्त्रीवादी चळवळीचे योगादान : विशेष संदर्भ पंडिता रमाबाई | श्री. उत्तम भगवान गोरड | ८९ ते ९२ |
| २५. | सबाल्टर्न इतिहास :- नजर कैदेतील- हुतात्मा करवीर चौथे छत्रपती शिवाजी महाराज | प्रा.संदिप नामदेव मिरे | ९३ ते ९६ |
| २६. | आधुनिक महाराष्ट्रातील दलीत चळवळीची वाटचाल | प्रा. विशाल छबु पोटे | ९७ ते १०१ |
| २७. | नाशिक जिल्ह्यातील आदिवासींचे स्वातंत्र्य चळवळीतील योगदान | प्रा. डॉ. वाय. एम.साळुंके | १०२ ते १०७ |
| २८. | राजर्षी शाहू महाराजांचे कृषिविषयक धोरण | प्रा. डॉ. राजेंद्र गायकवाड<br>प्रा.डॉ. बाळासाहेब दास | १०८ ते ११२ |
| २९. | शेतकरी चळवळी | बदामे स्वाती निवृत्ती | ११३ ते ११५ |
| ३०. | शेतकरी चळवळ- एक अभ्यास | प्रा.सोनवणे दि.ज. | ११६ ते ११९ |
| ३१. | अहमदनगरमधील वंचित हमाल कामगार चळवळ -- हमाल | डॉ. किसन अंबाडे | १२० ते १२२ |
| ३२. | अहमदनगर जिल्हयातील जंगल सत्याग्रह | डॉ. मीना चंद्रभान साळे | १२३ ते १२५ |
| ३३. | महिला चळवळ आणि सामाजिक बदल | डॉ. राधाकृष्ण जोशी | १२६ ते १२७ |
| ३४. | भारतीय कामगार चळवळीचे आद्य जनक नारायण मेघाजी लोखंडे | प्रा. डॉ .राजाराम सोनवणे | १२८ ते १३० |
| ३५. | राष्ट्रीय पातळीवरील चर्चासत्र 'वंचितांच्या चळवळी' या साठी लिहिलेला शोधनिबंध महाराष्ट्रातील स्त्री चळवळीच्या वाटचालीचे टप्पे | डॉ. स्वाती काळभोर | १३१ ते १३४ |
| ३६. | शेतकऱ्यांच्या समस्या आणि मराठी वृत्तपत्रे | डॉ.प्रा.नवथर भा. शं. | १३५ ते १३७ |
| ३७. | Disability And Gender Under The Umbrella Of Subaltern Studies | Mr. Vijay sahebrao Kadam, | १३८ ते १४१ |
| ३८. | इ.स. १८७५ मधील दख्खनेतील उठाव | श्री. सचिन अभिमन्यू ओहोळ | १४२ ते १४४ |
| ३९. | वि.दा.सावरकर यांचे धर्मसुधारणेविषयक विचार | प्रा. धिरज भिमशा शाखापुरे | १४५ ते १४८ |

27

# नाशिक जिल्ह्यातील आदिवासींचे स्वातंत्र्य चळवळीतील योगदान

**प्रा. डॉ. वाय.एम.साळुंके**
कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, ओझर (मिग)
ता. निफाड, जि. नाशिक (महाराष्ट्र)

भारतीय इतिहासातील दाखले बघितले असता भारताची मुळ संस्कृती आदिम संस्कृती व त्यांनतर वैदिक संस्कृती तयार झाली. आदिवासी समाज कायमच त्याग, ज्ञान, वैराग्य, राष्ट्रभक्ती, निस्वार्थ सेवा वृत्ती या गुणांनी संपन्न आहे. पुराण काळात निषादराज ग्रह यांनी केलेले आत्मसमर्पन, राष्ट्राची भक्ती वैराग्य हे सेवा भावनेचेच प्रतिक आहेत मध्ययुगीन काळातील मोगल कालखंडात रोहतासच्या किल्ल्यावर झालेले मोगलांचे आक्रमण परतवून लावण्यासाठी उराव जातीच्या आदिवासींनी आपले बलिदान दिले. गोंडवणा प्रांतातील राणी दुर्गावतीचे बलिदान, छत्रपती शिवाजीच्या स्वराज्य उभारणीत व किल्ल व्यवस्था पहाण्यात सह्याद्रीच्या डोंगरदऱ्यातील महादेव कोळी या आदिवासींचा हातभार महत्त्वाचा ठरतो. हळदी घाटाच्या युध्दात महाराणा प्रताप यांचा जीव वाचवण्यासाठी त्यांचा मुकूट स्वतःच्या शिरावर धारण करून बलिदान देणारा भिल्लराज झाला. हा आदिवासी जमातीच्या पराक्रमांचा इतिहास महत्त्वपूर्ण मानला जातो. इ. स. १८५७ च्या इंग्रजाविरूध्दच्या स्वातंत्र युध्दात भारतातील बहुसंख्य भागात उठाव झाले असतांना आदिवासींनी अभुतपूर्व अशी कामगीरी बजावलेली होती. १८५७ च्या स्वातंत्र्य संग्रमात बिहारचे सुप्रसिध्द ठाकूर विश्वनाथ सहादेव यांच्या नेतृत्वाखाली आदिवासींनी इंग्रजी सैन्यविरूध्द अनेक लहान मोठया लढाया केल्या याची इतिहासात नोंद आहे. मुंडा जातीच्या बिरसा मुडांने आदिवासींन मध्ये इंग्रजी सत्तेच्या विरोधात कार्य केले. शेवटी इंग्रजांनी त्याला पकडून अतिशय यातना दिल्या त्यात बिरसा मुंडाने बलिदान दिले.

**महाराष्ट्रातील आदिवासी चळवळी :-**

द्विभाषीक मुंबई राज्यात आदिवासी जमातीच्या चळवळी झाल्या. भिल्ला, गोंड, कोकणा, महादेव कोळी, या जमाती मुळातच लढवाय्या व राजकर्त्या होत्या ब्रिटिशांनी आपला साम्राज्य विस्तार करण्यासाठी या जमातीची राज्य व हक्क काढुन घेवून त्यांच्यावर कडक बंधने लादली. त्यामुळे या आदिवासी जमाती मध्ये असंतोष निर्माण झाला. या आदिवासी जमातींनी ब्रिटिशांच्या विरोधात बंड पुकारले. महाराष्ट्र ब्रिटिश सत्तेविरूध्द पहिला आदिवासी उठाव नाशिक जिल्ह्यात नांदगावाजवळ मांडवद येथे इ.सं. १८१८ मध्ये रामजी भांगरे व रामा किरवा यांच्या नेतृत्वाखाली भिल्ल, महादेव कोळी, जमातीने केला. या उठावाचे लोण नाशिक, अहमदनगर, व पुणे जिल्ह्यात पसरले. इ.स. १८३० मध्ये जुन्नर प्रांतात भाऊखरेल व चिमणाजी दरबारे यांनी उठाव केला या उठावात ५४ महादेव कोळी व हे नेते ब्रिटिशाविरूध्द लढता लढता मारले गेले. अहमदनगरच्या राघोजी भांगरे व गोविंदराव खांडे यांनी आदिवासींना संघटीत केले. परंतु राघोजी भांगरे मात्र ब्रिटिशांकडून पकडल्या गेले. १८४८ मध्ये त्याला फाशी देण्यात आली. पश्चिम खानदेशातील सातपुडा परिसरात उभेड बसावा याने पाच हजार आदिवासींना एकत्र करून इंग्रजांशी सशस्त्र लढा दिला या सशस्त्र तुकडी ने बऱ्हाणपुर पर्यंतच्या सातपुडा प्रदेशात चळवळ उभी केली. या चळवळीमुळे ब्रिटिश अधिकारी बिल ऑगबाय याने या भागात या चळवळीच्या नेत्याशी शांततेसाठी वाटाघाटी केल्या. या चळवळीमुळे स्थनिक भिल्लांना इंग्रजांनी जमिनी वाटून दिल्या. तसेच जंगल उत्पादनावरील स्थानिक भिल्लांचे हक्क मान्य करण्यात आले. या भिल्लांची संघटीत शक्ती व

ISBN NO. 978-93-83401-27-7

लढावू वृत्तीचा फायदा घेण्यासाठी कॅप्टन आट्रॉय याने १८३१ मध्ये खानदेश भिल्ल पलटणीची स्थापन केली. १८५७ च्या उठावात तात्या टोपेंना अनेक भिल्ला लोकांनी मदत केली. १८६८ ला भिल्ला बंडखोर गोंविदगुरू यांनी इंग्रजाविरूध्द भिल्लांना संघटीत केले (१)

**नाशिक जिल्ह्यातील आदिवासींचे ऐतिहासिक महत्त्व :-**

नाशिक जिल्ह्याला प्राचीन, मध्ययुगीन व आधुनिक असा ऐतिहासिक इतिहास आहे. या इतिहासापासून नाशिक जिल्ह्यातील आदिवासी बाहेर राहू शकत नाही. आदिवासींना जसा सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक व आर्थिक, भरिव असा इतिहास आहे. त्या प्रमाणे या आदिवासींचे राजकीय सहभागाचे ऐतिहासिकत्व ही भरिव प्रमाणात आहे. आधुनिक काळातील स्वातंत्र्य चळवळीतील योगदान आखिल भारतीय स्तरापासून ते नाशिक आदिवासी क्षेत्रापर्यंत दिसून येते. आदिवासींच्या राजकीय सहभाग बद्दल इतिहास लेखन फारसे नसल्याने आदिवासींच्या पराक्रमाचा राजकीय इतिहास वाचकांपर्यंत पोहचलेला दिसत नाही या आदिवासी समाजाची राजकीय ऐतिहासीक पार्श्वभूमी आणि आदिवासी संस्कृती भारतीय समाजापर्यंत पोहचलेली नाही म्हणून या आदिवासी समाजाविषयी आज्ञान व गैरसमज आहेत आपण आदिवासींच्या राजकीय पराक्रमाकडे दुर्लक्षच करतो वास्तविक या समाजाच्या इतिहास पराक्रमी आहे नाशिक जिल्ह्यातील आदिवासी क्षेत्र विशेषत: पश्चिम भाग ज्याच्या पश्चिम उत्तर टोकास सह्याद्री पर्वताच्या उत्तरेकडील सीमा ज्या भागात संपते, त्यास बागलाण असे संबोधले जाते. बागलाण (सटाणा) हा भाग कोकण आणि भिल्लांचा प्रदेश म्हणुन ओळखला जातो. या भागातील साल्हेर-मुल्हेर असे प्राचीन किल्ले ज्यावर राठोड वंशीय राजपुतांचे बागुल नावाचे प्रसिध्द राजघराणे चांदवड, कळवण, बागलाण या प्रदेशावर राज्य करत होते. त्या काळातील मुस्लिम सत्तेला दाद न देता सुमारे साडेतीनशे वर्ष या भागावर राज्य करत होते या बागुल घराण्याच्या नावावरून या प्रदेशाला बागलाण असे नाव पडले. (२) बागलाणच्या दक्षिण पश्चिमेला आदिवासी कोकणी लोकांचे स्वतंत्र सुरगाणा राज्य होते. यावर पवार कोकणी वंशीय राजे होते. सुरगाणा राज्याच्या दक्षिण पश्चिमेला पेठ महाल हा जहागिरदारांचा प्रदेश भगवंतराव यांच्या अधिपत्याखाली होता.

**नाशिक जिल्ह्यातील आदिवासींची स्वातंत्र चळवळ:-**

नाशिक जिल्हा क्षेत्राने स्वातंत्र चळवळीत महत्त्वपूर्ण सहभाग घेतला आहे या जिल्हा क्षेत्रामध्ये आदिवासी क्षेत्र सुध्दा मागे राहिले नाही भरतात ब्रिटिशांविरूध्द पहिला मोठा लढा १८५७ चा उठाव झाला परंतु १८५७ च्या उठावा अगोदर ब्रिटिशांविरूध्द आदिवासी जमातींनी अनेक ठिकाणी लढे उभे केले होते. या लढयांमध्ये नाशिक जिल्ह्यातील पेठचा स्वातंत्र लढा, चणकापुरचा लढा, पठावा व भिलवाड येथील सत्याग्रह महत्त्वपूर्ण आहे.

**पेठचा लढा:-**

नाशिक जिल्ह्यातील पेठ हे संस्थान होते या संस्थानांच्या प्रमुख हरसुल येथील राणी बेगम होत्या. अहमदनगरच्या निजाम शाहीचे पेठ हे संस्थान मांडलिक होते. संस्थानामध्ये भगवंतराय निलकंठराव देशमुख उर्फ भाऊराजा नावाचे दुसरे एक संस्थानिक होते १४ गावाचे ते प्रमुख होते. हरसुलच्या राणी बेगम चा मुत्यू झाल्यानंतर पेठ संस्थान ब्रिटिश सरकारमध्ये विलीन झाले. पेठेचे संस्थान आपल्याला मिळावे म्हणून त्यांनी या संस्थानावर वर्चस्व केलेल्या ब्रिटिशांकडे अर्ज केला परंतु लार्ड डलहौसींच्या दत्तक वारसा नामंजुर कायद्याने तो फेटाळून लावला, त्यामुळे भगवंतराव निलकंठराव देशमुख राजे ब्रिटिशांच्या विरोधात जाऊन त्यावेळी इ.स. १८५७ च्या उठावात सामिल झाले होते.

१८५७ च्या उठावाच्या वेळी भारतातील ब्रिटिशांविरूध्द नाराज असलेले अनेक संस्थाने या उठावात सामील झाले. या संस्थानाचे नेतृत्व दिल्लीचा बादशाहा बहादूरशहा जफर यांच्याकडे देवुन


ISBN NO. 978-93-83401-27-7

बागलाण येथील भिलवाड मध्ये भिल्ल व कोकणा जमातीने जंगल सत्याग्रह केला. कळवण तालुक्यात सप्तश्रृंगी डोंगराजवळ सत्याग्रह झाला. इ.स. १९३० मध्ये या जंगल सत्याग्रहाविषयी पियाजी गावीत देवलगाव, पळसदे गावाचे काळु कुंवर, देवलगावचे दावल लबाडे, चिंचपाडयाचे सखाराम ठाकरे, अमदाराचे दामु वाघमारे इ. आदिवासी तरूणांनी आदिवासी जनतेत जागृती केली. (४) या जंगल सत्याग्रहासाठी ढोल नगारे, वाजवून गावोगावच्या लोकांना बोलविण्यात आले. या जागृती मुळेच कळवण तालुक्यातील चनकापुरगांवच्या धरणाजवळच्या टेकडीवर हाजारोच्या संख्येने आदिवासी हातात तिर कामेटे, कुऱ्हाडी, भाले, लाठया घेऊन ब्रिटिशांशी लढण्यास सज्ज झाले. आदिवसींनां आहिंसात्मक लढयाचे स्वरूप माहिती नव्हते. लढा म्हणजे हत्यार हवेच हा समज आदिवासींचा होता. इंग्रज अधिकाऱ्यांनी या सत्याग्रही नेतृत्व करणाऱ्या नेत्यांना समजून सांगण्याचा प्रयत्न केला परंतु इंग्रज येथून गेले पाहिजे, आमचे हक्क मिळाले पाहिजे अणि गांधीबाबाचे राज्य आले पाहिजे ऐवढेच आदिवासींना माहित होते. शेवटी १८ ऑक्टोंबर इ.स. १९३० इंग्रजांनी टेकडीवर जमलेल्या आदिवासींना घेरले. आदिवासींना हाकलण्यासाठी हवेत गोळीबार करण्यात आला. या आदिवासींनी आपल्या पारंपारिक हत्याराने तोंड देण्यास सुरूवात केली असता इंग्रज पोलीसांच्या बंदुकीच्या गोळया जमावाच्या पायावर, हातावर, पोटावर, छातीवर लागल्या यात काही लोकांचा मृत्यू झाल्यावर जमावाची पळापळ सुरू झाली. या पळापळीत काही आदिवासी तलावात बुडाली. दीड दिवस चाललेल्या या लढयात शंभराच्या वर कोकणा आदिवासी मारले गेले. या सत्याग्रहाचे नेतृत्व करणाऱ्या सहा पुरूषांना शिक्षा झाली अशा या सविनय कायदेभंग चळवळीच्या प्रवाहात झालेल्या लढयाला चणकापूरचा लढा म्हटले जाते.

**जंगल सत्याग्रह :-**

चणकापूरच्या लढा संपल्याने जंगल सत्याग्रहाचे लोण थांबले नाही या उलट नाशिक जिल्ह्यातील पेठ, सुरगाणा तालुक्यात कोकणा जमातीने अनेक सामुदायिक जंगल सत्याग्रह केले. बागलाण आणि आजुबाजूच्या प्रदेशात गेल्या चार ते पाच वर्ष दुष्काळ असतांना ब्रिटिशांनी कायद्यानुसार जंगलातील कुरणांमध्ये ग्रामीण व आदिवासी जनतेच्या गुरे ढोरांना चारण्याची मनाई केली, त्यात वनखात्याने जंगलात चरण्यास आलेल्या गुरे ढोरांना पकडून कोंडवाडयात टाकले, त्यात ज्यांनी गुरे कोंडवाडयातून सोडली नाही. तेव्हा ती गुरे विकून कोंडवाडयाची दंड रक्कम वनखात्याने वसूल केली. त्यामुळे बागलाण व आजुबाजूच्या आंदोलकांनी ब्रिटिश वनखात्याच्या विरोधात अदभूतपूर्व आंदोलन केले. ते म्हणजे कोंडवाडयातील जनावरे सोडायची नाहीत दंड वसुलसाठी जे लिलाव होतील त्या कोणीही जनावरे विकत घ्यायची नाहीत. त्यामुळे कोंडवाडे भरू लागली वनखात्याला या जनावरांचा चारा पाणी करणे आवघड होवू लागले या काळात वनखात्याच्या विरोधात जनता इतकी होती कि, वनखात्याच्या लोकांना दैनंदिन गरजेच्या वस्तू देणे लोकांनी बंद केले. काही लोकांनी कोंडवाडे फोडून जनावरे नेली अशा लोकांना अटक करण्यात आली. ऐवढेच नव्हे तर आत वनखात्याचे अधिकारी दंड वसुलसाठी घरात घुसून लोकांची लाकडे, कोळसा, वस्तू जप्त करू लागली. ब्रिटिश सरकारच्या वनखात्याचे अन्यायी धोरण व दुष्काळ या दोघांचे उग्र स्वरूप पाहुन आंदोलकांनी बागलाण दुष्काळ निवारण कमिटी स्थापन केली या कमिटीने सदर अन्यायी धोरणाचा कळवण, चांदवड, नांदगाव, मालेगांव या नाशिक जिल्ह्याच्या तालुक्यात व धुळे, नंदूरबार जिल्ह्यांपर्यंत प्रसार केला (५) त्यानंतर ऑगस्ट इ.स. १९३० मध्ये हजारो आंदोलक भिलवाड येथे जमले यात कोकणी व भिल्ल समाजाची संख्या जास्त होती. या सत्याग्रहींनी महात्मा गांधी की जय म्हणत ब्रिटिश सरकारला विरोध दर्शविण्यासाठी चांदीच्या कुऱ्हाडींनी जंगलातील झाडावर घाव व चांदीच्या विळयाने जंगलातील गवत कापले व आपला विरोध दर्शविला या वेळी ब्रिटिश पोलिसांनी आंदोलकांची धरपकड केली त्यात काही आंदोलक भूमिगत झाले. भिलवाड प्रमाणे पठावा येथील दहा हजार संख्येने

ISBN NO. 978-93-83401-27-7 

असलेल्या कोकणी व भिल्ल जमातीने सिताराम शास्त्री, तुमदू भावसार, शेवाळे वकील यांच्या नेतृत्वाखाली भिलवाड प्रमाणे जंगल सत्याग्रह केला. इ.स. १९३० च्या सविनय कायदेभंग राष्ट्रीय चळवळीच्या वेळी झालेले हे जंगल सत्याग्रह महत्त्वपूर्ण आहेत.

**सिन्नरच्या नांदूर शिंगोटेचा वीर भागोजी नाईक :-**

नाशिक जिल्ह्यातील सिन्नर तालुक्यातील नांदूरशिंगोटेचा क्रांतिकारक भागोजी नाईक यांच्यावर इ.स. १८५५ मध्ये भिल्ल व महादेव कोळी यांच्या उठावाला उत्तेजन दिल्याचा आरोप ठेवून ब्रिटिशांनी शिक्षा फर्मावली तुरूंगातून सुटल्यावर भागोजीनी ५० तरूण भिल्लांची तुकडी तयार करून ब्रिटिशांच्या विरोधात उठाव केले. सिन्नर, संगमनेर, पारनेर येथिल मामलेदारांनी भागोजीला शरण येण्याचे आव्हान केले. परंतु भागोजीने नाशिक पुणे घाटात आपला दबदबा कायम ठेवला. त्यामुळे अहमदनगरचा पोलिस अधिकारी जे डब्ल्यु हेंड्री याने भागोजीवर सशस्त्र आक्रमण केले परंतु या आक्रमणात भागोजी कडून हेंड्रीच ठार झाला त्यामुळे बाकीच्या पोलीसांना माघार घ्यावी लागली. इ.स. १८५७ च्या उठावाच्या काळात भागोजीच्या टोळयानी अहमदनगर जिल्ह्यातील रामशेरपूर येथे इंग्रजांशी सशस्त्र सामना केला असता त्यात काही कैमन लेफ्टनंट ग्रॅहम, मेजर चॅपमन इ. पोलिस अधिकारी जख्मी झाले. (६)

भागोजीचा भाऊ महिपतीने कॅ. नूताळ या इंग्रज अधिकाऱ्यांशी लढा दिला या लढयात महिपती शहीद झाला नंतरच्या काळात भागोजीने आपले सैन्य वाढवले १८५९ मध्ये भागोजी व हरजी यांनी इंग्रजांचे आतोनात आर्थिक व शस्त्रास्त्रांचे नुकसान केले या काळात कॅ. नुताळशी झालेल्या लढयात भागोजींचा मुलगा यशवंत मारला गेला. भागोजीला पकडण्यात अयशस्वी झालेल्या इंग्रजांनी आता मेजर फॅक्साचर यांची नेमणुक केली होती. यावेळी फितुरीमुळे इंग्रजांकडून भागोजीच्या टोळयांचा पराभव होऊ लागला. गुप्तहेरांकडून इंग्रजांना भागोजी सिन्नर मधील साखर डोंगराखाली मुक्कामाला आहे, ही बातमी कळाली. मेजर फॅक्साचर याने भागोजींची चारी बाजुने नाकाबंदी केली. इंग्रजांनी भागोजीला शरण येण्यास सांगितले परंतु भागोजी व त्याच्या माणसांनी शरण येण्यास नकार दिल्याने इंग्रजांकडून भागोजी मारला गेला व यात भागोजीच्या कुटूंबाची इंग्रजांनी कत्तल केली. थोडक्यात अशा तऱ्हेने इंग्रजांशी लढणाऱ्या आदिवासी महादेव कोळी व भिल्ल जमातीने नेतृत्व करणाऱ्या क्रांतिकारकाचा शेवट झाला आज भागोजी नाईकची समाधी नांदूर शिंगोटे गावाजवळ आहे.

**नाशिक जिल्ह्यातील आदिवासींची गांधीवादी चळवळः-**

नाशिक जिल्ह्यातील गांधीवादी चळवळीत काम केलेले दादासाहेब बिडकर, गोविंदराव श्रॉफ, अच्चुतराव देशपांडे, दादासाहेब पोतनीस यांनी गांधी तत्त्वानुसार ग्राम सुधारणेचे कार्य हाती घेतले. त्यात महाराष्ट्र राज्य प्रदेश काँगेसचे नेते शंकरराव देव यांच्या सूचनेवरून दादासाहेब बिडकर व दादासाहेब पोतणीस यांनी कँग्रेस पक्षाचे काम करणेसाठी बागलाण हा आदिवासी क्षेत्र असलेला तालुका निवडला. या भागात चळवळी केल्याने दादासाहेब बिडकर, पोतनीस, अच्चुतराव देशपांडे यांना इंग्रजांनी पकडून धुळे येथिल कारागृहात पाठवले. शिक्षा भोगल्यानंतर या मंडळीनी आदिवासी क्षेत्रात काम करत असतांना दादासाहेब बिडकरांचा आदिवासी क्षेत्रात आदिवासींची सेवा व ख्रिश्चन धर्म प्रसार करणाऱ्या मिस लॅथम यांच्याशी परिचय झाला. या मिस लॅथम यांना दादासाहेब बिडकरांनी मदत केली याच मदतीमुळे आदिवासी क्षेत्रात सामाजिक कार्य व गांधी तत्त्वे पसरविण्यासाठी मिस लॅथम, बिडकर, पोतनीस, दामु आण्णा फाटक यांनी १९३७ मध्ये अवधूत भंडारी यांच्या घरात डांगसेवा मंडळ या संस्थेची नाशिक जिल्ह्यात स्थापन केली. डांगसेवा मंडळाने कळवण, बागलाण, तालुक्यात शाळा, वस्तीगृह आदिवासींसाठी सुरू केली. बिडकरांना या कामात आवारी गुरूजी सारखे सहकारी पुढे मिळाल्याने पेठ सारख्या भागात गांधीवादी चळवळ व शैक्षणिक चळवळ उभी केली. पेठ तालुका कँग्रेस कमिटीच्या

सेक्रेटरी व डांगसेवा मंडळाचा कार्यकर्ता अशा दोन्ही भूमिका आवारी गुरूजींनी केल्या. इ.स. १९४६ मध्ये विधानसभेच्या निवडणुकीत बागलाण व मालेगांव मतदार संघातून दादासाहेब बिडकर मदन पाटील निवडून आले या राजकीय पदाचा उपयोग आदिवासी विकासाकरिता होण्यासाठी आदिवासी जंगल कामगारांना जंगल ठेकेदारांकडून होणारी पिळवणूक थांबविण्यासाठी जंगल कामगार सहकारी संस्था स्थापन करण्याचा निर्णय झाला. या सहकारी संस्था नुसार जंगल कामगारांना जंगलातील लाकडे तोडण्यास सहकारी तत्वानुसार परवानगी देण्यात आली. थोडक्यात नाशिक जिल्ह्यात गांधीवादी चळवळ निर्माण करून आदिवासी क्षेत्राच्या विकासासाठी मोठे प्रयत्न स्वातंत्र्य कालखंडात झाले.

भारतातील आदिवासी चळवळीला प्राचीन इतिहास आहे. या इतिहासाला त्याग, विरता या गोष्टी दिसुन येतात. त्याच प्रमाणे नाशिक जिल्ह्यातील आदिवासींच्या चळवळीला मोठा इतिहास दिसतो. भारतात ब्रिटिशाविरूध्द पहिला लढा इ.स. १८५७ ला झाला परंतु त्या अगोदर ब्रिटीशांविरूध्द आदिवासींनी लढा दिलेला दिसतो.

**संदर्भसूची :-**


१) देशमुख बी. ए, कोकणा-कोकणी इतिहास आणि जीवन, सुगावा प्रकाशन, पुणे, पृ. क्र. ८६

२) गारे गोविंद, आदिवासींचे शिक्षण, सांकेत प्रकाशन, औरंगाबाद पृ. क्र. ९

३) गोरे गोविंद, बदलाच्या उंबरठयावर कोकणा आदिवासी, श्रीविद्या प्रकाशन, पुणे., पृ. क्र. ६८

४) भामरे आर. पी. साळूंके वाय. एम, मुंबई विधीमंडळातील कर्मवीर भाऊसाहेब हिरे विचार वेध, ललित प्रकाशन नाशिक, पृ.क्र. १९

५) गारे गोविंद, स्वातंत्र्य लढयातील आदिवासी क्रांतिकारक, श्रीविद्या प्रकाशन, पुणे, पृ. क्र. ४

६) निकम गौतम, क्रांतिकारी, क्रांतिकारी आदिवासी जननायक, विमलाकिर्ती प्रकाशन, चाळीसगांव, पृ. क्र. ५